तरुण भारत



कोल्हापूर : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नानासाहेब थोरात, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. डी. के. गायकवाड आदी.

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन शपथ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आज शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी प्रख्यात संशोधक डॉ. नानासाहेब थोरात यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. दत्तात्रय गायकवाड आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# ध्येय निश्चित केल्यास प्रवास सुखकर : कुलगुरू डॉ. शिर्के

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी वक्तशीरपणा आणि शिस्त अंगीकारली पाहिजे. इतरांपेक्षा वेगळे बनण्यासाठी वाचन कौशल्य वृध्दीगंत करावे. विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चित केल्यास आयुष्याचा प्रवास सुखकर होतो, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ परिसरामधील मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विदेशी भाषा अधिविभागांमध्ये विद्यार्थी विकास विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ इंडक्शन प्रोग्रामाचे आयोजन केले होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बी. ए.स्पोटर्स हा अभ्यासक्रम विद्यापीठ परिसरामध्ये सुरू करण्यात येत आहे. बी.ए.फिल्म मेकींग हा अभ्यासक्रमही सुरू केला जाणार आहे. मुख्य अभ्यासक्रमाबरोबरच अन्य चांगले उपक्रम विद्यार्थ्यांना करण्यासारखे आहेत. विद्यापीठ परिसर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. यासाठी एनएसएस विभागामार्फत प्रयोगशील उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. प्रगतीचा ध्यास घेवून उच्च पातळीवर जाण्यासाठी विद्यार्थी नेहमी प्रयत्नशील राहिले पाहिजेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या ठिकाणी विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत, त्याचा लाभ घेतला पाहिजे. संशोधन करीत असताना सर्जनशीलता आपल्यामध्ये बिंबवणे फार महत्वाचे असते. स्वागत व प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले.

क्रीडा अधिविभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, उपकुलसचिव श्रीमती भक्ती नाळे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यार्थ्यांमध्ये सर्व विषयांप्रती जिज्ञासा, आदरभाव आवश्यक

## डॉ. नानासाहेब थोरात; विद्यापीठात 'मीट दि सायंटिस्ट' उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांत आंतरविद्याशाखीय अभ्यास व संशोधनाचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी त्यांच्या मनात सर्व विषयांप्रती जिज्ञासा व आदरभाव निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मेरी क्युरी फेलो डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षातर्फे 'मीट दि सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत शुक्रवारी डॉ. थोरात यांचे 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील जागतिक संधी व उपयोजन' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांनी आज ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहायला हवे. विज्ञान विषयांइतकेच तत्त्वज्ञान व सामाजिक शास्त्रांतील ज्ञान व संशोधन महत्त्वाचे आहे. यासाठी सर्व विषयांचे ज्ञान महत्त्वाचे असते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी, त्याची ज्ञानसक्ती व मानवी सेवेची आकांक्षा या बाबी महत्त्वाच्या असतात. कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय कक्षाचे संचालक डॉ. एस.बी. सादळे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक डॉ. नानासाहेब थोरात. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

**(फोटो : अर्जुन टाकळकर)**

पुण्यनगरी

# स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये शनिवारी स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन दि. २६ ऑगस्टपर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे.

शिवाजी विद्यापीठामध्ये दीड महिन्यापूर्वी सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी हा अभ्यासक्रम सुरू झाला. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने फिल्डवर जाऊन केलेल्या फोटोग्राफीचे हे प्रदर्शन आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक प्रसंग टिपले आहेत. यातून विद्यार्थ्यांचा कलाविष्कार, संवेदनशीलता, विविध विषयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तसेच त्यापाठीमागचा विचार लक्षात येतो. हे प्रदर्शन पाहण्याची चांगली संधी कोल्हापूरवासीयांना आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू प्रा. डॉ. शिर्के यांनी यावेळी केले. फोटोग्राफीचे सहयोगी शिक्षक विराज चव्हाण, अभिजित गुर्जर, जयसिंग चव्हाण, राहुल शहा यांनी विद्यार्थ्यांना फोटोग्राफीसंदर्भात फिल्डवर जाऊन मार्गदर्शन केले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी डॉ. रत्नाकर पंडित, दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठामध्ये स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. रत्नाकर पंडित आदी.

लोकमत

# धावली विद्यापीठातील तरुणांची 'ऊर्जा'

## सीपीआरमध्ये रक्ताचा तुटवडा : शिबिरात २२१ दात्यांचे रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शहरातील सीपीआर रुग्णालयात अपुरा रक्तपुरवठा असून प्रशासनाने रक्तदानाचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ऊर्जा मैत्री परिवाराने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात तब्बल २२१ दात्यांनी रक्तदान केले. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात हे शिबिर झाले.

कोल्हापुरातील सीपीआर रुग्णालयात जिल्ह्यातील कानाकोपऱ्यांतून अनेक आबालवृद्ध रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. या रुग्णालयातील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. डेंग्यू रुग्णांना



रक्तपुरवठा अधिक करावा लागत आहे शिवाय रक्तदान शिबिरेही थंडावली आहेत. याचा परिणाम रुग्णसेवेवर होत होता. ही बाब कळाल्यानंतर ऊर्जा मैत्री परिवार या ग्रुपने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाशी संपर्क साधून हे शिबिर घेतले. त्यात विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, कर्मचारी, वसतिगृहातील विद्यार्थी यांनी सहभागी होऊन रक्तदान केले. त्यात मुलींचाही उत्स्फूर्त सहभाग राहिला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी रक्तदान शिबिरास भेट दिली. यावेळी प्र. कुलगुरु प्रा. पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एम. एस. देशमुख, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. या शिबीर आयोजनाबदल सीपीआर प्रशासनाने ऊर्जा मैत्री परिवाराचे आभार मानले. शिबीर यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. चौगले, सुनील दळवी, दिग्विजय देसाई, मतीन शेख, विशाल पाटील, रणजित कांबळे, प्रदीप बोभाटे, राजेश पाटील, राम चव्हाण, विश्वास पाटील, दया निकाडे, जयवंत भोसले, उत्तम पवार, दत्तात्रय कदम, अनंत गिरीगोसावी, सुशांत माळवी, सचिन लोंढे पाटील, यांनी विशेष परिश्रम घेतले.

लोकमत

# विद्यापीठात सद्भावना दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात २९ ऑगस्टला मॅरेथॉन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात २९ ऑगस्टला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. यूजीसीच्या सूचनेनुसार, जी-२० युनिव्हर्सिटी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यापीठात सकाळी ७ वाजता मॅरेथॉन आयोजित केली आहे. विद्यापीठातील मुख्य इमारतीच्या मेन गेटपासून याला सुरुवात होईल. स्पर्धेत अधिविभागप्रमुख, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन क्रीडा विभागातर्फे केले आहे.

पुढारी

# स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये शनिवारी स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन २६ ऑगस्टपर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे.

विद्यापीठामध्ये दीड महिन्यापूर्वी सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी अभ्यासक्रम सुरू झाला आहे. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने फिल्डवर जाऊन केलेल्या फोटोग्राफीचे प्रदर्शन आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक प्रसंग टिपले आहेत. यातून विद्यार्थ्यांचा कलाविष्कार, संवेदनशीलता, विविध विषयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यामागील विचार लक्षात येतो. प्रदर्शनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

फोटोग्राफीचे सहयोगी शिक्षक विराज चव्हाण, अभिजीत गुर्जर, जयसिंग चव्हाण, राहुल शहा यांनी विद्यार्थ्यांना फोटोग्राफीसंदर्भात फिल्डवर जाऊन मार्गदर्शन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, दिग्दर्शक अनुप जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सद्‌भावना दिन शपथ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्‌भावना दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी सर्व उपस्थितांना सद्‌भावना शपथ दिली. यावेळी प्रख्यात संशोधक डॉ. नानासाहेब थोरात यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. दत्तात्रय गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात २९ रोजी मॅरेथॉन स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यूजीसी नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार सर्व विद्यापीठांत जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ही मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ५५५ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरु आहेत. परीक्षेला ५५५ विद्यार्थी उपस्थित होते. ११ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाल्या. मास्टर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमाचा निकालही घोषित करण्यात आला. आजअखेर ६३३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सद्‌भावना दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शांती व अहिंसाची शपथ घेत सद्‌भावना दिन साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी उपस्थितांना सद्‌भावना शपथ दिली. यावेळी प्रख्यात संशोधक डॉ. नानासाहेब थोरात यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. दत्तात्रय गायकवाड आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात २९ ऑगस्ट रोजी मॅराथॉन स्पर्धा

कोल्हापूर : दिल्ली विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)च्या सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठात जी२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्रॅम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून मंगळवार, २९ रोजी सकाळी ७ वाजता मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. या मॅराथॉन स्पर्धेची सुरुवात मुख्य इमारतीसमोरील गेट नंबर एकपासून होणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली.